**विभागीय सहनिबंधक, सहकारी संथा पुणे विभाग,पुणे**

**Pro-active Dislosure under Section (4) (1)(b) of the organization Act २००५**

**१. The particulars of organisation functions and duties**
**(रचना, काय व कर्तव्ये यांचा तपशील)**

• पुणे विभागाचे अधिनस्त जिल्हा उपिनबंधक, सहकारी संथा पुणे शहर, पुणे ग्रामीण व सोलापूर कार्यालये व सदर जिल्हयामधील तालुका कार्यालये कार्यरत आहेत.

**• पुणे विभागात दिनांक ३१/०३/२०१७ अखेर एकुण ३३,६९९ नोंदणीकृत सहकारी संस्था असुन त्यापैकी ३२०६ पदुम संस्था आहेत.**

**• विभाग -1 विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था , पुणे विभाग पुणे यांच्या नियंत्रणाखालील विषय :-**

१.प्रशासन

२. लेखापिरक्षण

३. सहकारी पतसंस्था

४. औद्योगिक सहकारी संस्था सहकारी गृहनिर्माण संस्था

५. इतर सहकारी संस्था

६. शिक्षण, संशोधन व प्रशिक्षण

७. सहकारी प्रक्रिया संस्था

८. सहकारी पणन संस्था

९. सहकारी गोदामे

१०. सहकारी ग्राहक संस्था

११. कृषि उत्पन्न बाजार समित्या

१२.प्रक्रिया संस्था

## The Powers and duties of Officers and employees

## (अधिकारी व कर्मचारी यांचे अधिकार व कर्तव्ये)

विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, पुणे विभाग, पुणे व त्यांचे अधिनस्त अधिकारी यांच्या जबाबदाऱ्या

---------------------------------------------------------------------------------------------------------

१) सहकारी संस्था नोंदणी, उपिवधी नोंदणी करणे (कलम ९)

२) उपिवधीची दुरुस्ती /सुधारणा करणे व दुरुस्ती/सुधारणा नाकारणे (कलम १३) आणि उपिवधी सुधारणा करण्ययाचे निर्देश देणे (कलम १४)

३) संस्थेच्या नांव बदलास मंजूरी देणे ( कलम १५)

४) संस्थांचे एकत्रीकरण, हस्तांतरण, विभागणी किंवा रुपांतर यास मंजूरी देणे (कलम १७)

५) संस्थांचे एकत्रीकरण किंवा पुनर्रचना करण्याचे निर्देश देणे (कलम १८)

६) संस्थेची पुनर्रचना करण्याचा आदेश देणे (कलम १९)

७) संस्थांच्या भागीदारीस परवानगी देणे (कलम २०)

८) संस्थेची नोंदणी रद्द करणे (कलम २१)

९) एखाद्या संस्थेचा सदस्य म्हणून दाखल करुन घेण्यास नकार देण्यात आलेल्या व्यक्तीने केलेले अपिल निकालात काढणे (कलम २३)

१०) सदस्यांची संस्थेतून हाकलपट्टी करण्याचे ठरावास मान्यता देणे किंवा सदर सदस्यास पुन्हा सदस्य म्हणून दाखल करुन घेण्यास संमती देणे (कलम ३५)

११) एका सहकारी संस्थेतुन दुसऱ्या सहकारी संस्थेस कर्ज देण्यास संमती देणे (कलम ४४)

१२) समतीने तिची निवडणूक घेण्यासंदर्भात बुध्दिपुरस्सर कसूर केली असेल, तर आणि त्यामुळे कोणत्याही कारणास्तव, मुदत संपण्यापूर्वी समितीची निवडणूक घेता आली नसेल तर, समितीचे सदस्य त्यांचे अधिकारपद धारण करण्याचे बंद करतील व अशा परिस्थितीत कलम ७७ अन्वये प्राधिकृत अधिकारी नियुक्ती करणे.

१३) वार्षिक सर्वसाधारण सभा बोलाविण्यात किंवा तिचेपुढे ताळेबंद वगैरे ठेवण्याच्या बाबतीत कसूर करणारा (कलम ७५) किंवा विशेष साधारण सभा बोलाविण्यात कसूर करणारा (कलम ७६) अधिकारी किंवा समितीचा सदस्य यांस निवडणूकीसाठी अपात्र ठरविणे किंवा असा अधिकारी संस्थेचा नोकर असल्यास त्यास रु. ५०००/- पर्यंत दंड करणे.

१४) वार्षिक सर्वसाधारण सभा बोलाविण्याचा एखाद्या इसमास अधिकार देणे (कलम ७५)

१५) संस्थेची विशेष सर्वसाधारण सभा बोलिवणे किंवा ती बोलिवण्याचा एखाद्या इसमास अधिकार देणे (कलम ७६)

१६) समती सदस्यांची नियुक्ती, नवीन समिती, समितीची घटना करीत असते वेळी कोणताही सदस्य निवडून न येणे व नवीन समितीने पदभार न स्वीकारणे यावेळी प्राधिकृत अधिकाऱ्याची नियुक्ती करणे. (कलम ७७)

१७) समिती कर्तव्ये पार पाडण्यात कसूर करीत असेल, निष्काळजीपणा करीत असेल, तिची कामे उचितरित्या व सचोटीने पार पाडीत नसेल वा सदस्यांचा राजीनामा निरर्हता यामुळे किंवा अन्यथा समितीच्या रचनेत किंवा कार्यात दोष असेल तर संचालक समिती निलंबित करुन प्रशासक किंवा प्रशासकांची समिती नेमणे (कलम ७८)

१८) समिती सदस्याने संस्थेच्या हितास बाधा, कृती, निवडणूक घेण्यास कसूर व समितीची कामे पार पाडणेस नाकारणे व थांबवणे, गंभीर वित्तीय बाबी, अफरातफरी वा न्यायिक निदेश गणपूर्ती होत नसेल तेथे समिती अथवा संचालक वा सदस्यास निष्प्रभावित करणे. (कलम ७८ क)

१९) विवरणपत्रे दाखल करण्यास फर्मावणे (कलम ७९)

२०) संस्थेचे दप्तर आणि मिळकतीचा ताबा घेणे (कलम ८०)

२१) संस्थेने लेखापरिक्षक नियुक्ती न केल्यास पॅनलवरील लेखापरिक्षकाची नियुक्ती करणे (कलम ८१) आणि हिशेबातील दोष सुधारायचा संस्थेस आदेश देणे (कलम ८२)

२२) संस्थेची रचना, कामकाज आणि आर्थिक स्थिती यासंबंधी चौकशी करणे (कलम ८३)

२३) धनको संघीय सूंस्थेच्या अर्जावरुन वा स्वत:हून शासकीय रकमांसाठी ऋणको संस्थेची तपासणी घेणे. (कलम ८४)

२४) चौकशी अथवा तपासणीत उघडकीस आलेले दोष संस्थेच्या निदर्शनास आणणे आणि त्यासाठी उपाययोजना करण्याविषयी निर्देश देणे (कलम ८७)

२५) अपराधी,प्रवर्तक वगैरे विरुध्द नुकसानी आकारणे (कलम ८८)

२६) साक्षीसाठी हजर राहणेकरीता किंवा कोणताही दस्तऐवज हजर राहण्यास भाग पाडणे.(कलम ८९)

२७) संस्थेच्या कामकाजाचे निरिक्षण/तपासणी करणे (कलम ८९-अ)

२८) विवक्षित सहकारी संस्थांच्या देय थकबाकीची रक्कम , जमीन महसूलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूलीसाठी दाखला देणे. (कलम १०१)

२९) सहकारी संस्थेचे व्यवहार गुंडाळण्याचे आदेश करणे. (कलम १०२) ऋणपिरशोधकाची नेमणूक करणे. (कलम १०३)

३०) रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे मंजूरी वा मागणी केल्यावरुन विमा उतरविलेल्या बँकांचे समापन करणे, तिची पुनर्रचना करणे, तिची सिमती निष्प्रभावित करणे वगैरे संबंधित आदेश देणे. (कलम ११० अ)

३१) सहकारी कृषी आणि ग्रामीण बहुउद्देशिय विकास बँकेचे सदस्यांना दिलेल्या कर्ज रकमांच्या वसुलीसाठी प्रमाणपत्र देणे. (कलम १३७)

३२) महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० चे अंतर्गत नोंदणीकृत संस्थे व्यतिरिक्त इतरांना "सहकारी" या शब्दाचा वापर करण्यास मनाई करणे.(कलम १४५)

३३) कलम १४६ मधील अपराधाबाबत कलम १४७ अन्वये शिक्षेची तरतुद आहे. सदर अपराधाची दखल घेण्यासाठी कोणताही खटला दाखल करणेकामी कलम १४८(३) अन्वये निबंधकाची पूर्व मंजूरी घेणे.

३४) सहकारी संस्थांचे निवडणूकीतील उमेदवारी नामनिर्देशन नामंजुरीबाबत अर्जावरुन अपील ऐकून निकाल देणे (कलम १५२ अ)

३५) कलम ४, ९,११,१२,१३,१४,१७,१८,१९,२१,२९,३५,७७A,७८,७९,८८,१०५ यांचेवरील अपिलांचे अर्ज स्विकारुन निर्णय देणे. (कलम १५२)

३६) कोणत्याही दुय्यम अधिकाऱ्याने दिलेल्या निर्णयावर पुनर्निरीक्षण करणे. (सुनावणीचे अधिकार विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (प्रशासन) वा त्यांचेपेक्षा वरिष्ठ अधिकारी यांना आहेत.) (कलम १५४)

३७) संस्थेकडून शासनास देय रकमांची वसुली करणे.(कलम १५५)

३८) मालमत्ता जप्त करुन तिची विक्री करुन विवक्षित रकमा वसुल करणे. (कलम १५६)

३९) महाराष्ट्र राज्यातील नोंदणीकृत संस्थेस राज्याबाहेर व राज्याबाहेरील संस्थेस राज्यात शाखा उघडण्यास परवानगी देणे. (कलम १५९)

**तळटीप:-** निबंधक व त्यांचे अधिनस्त अधिकारी हे लोकसेवक आहेत. त्यांनी सद्भावनापूर्वक केलेल्या कृत्याबद्दल वाद, खटला, कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही. (कलम १६१, कलम १६२) ***

• विभाग -3 The procedure followed in the decision making process, including channels of supervision and accountability

(निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत अनुसरण्यात येणारी कार्यपध्दती, तसेच पर्यवेक्षण आणि उत्तरदायित्व प्रणाली)



• **विभाग** 4. **The norms set by it for the discharge of functions**
( स्वत:ची कार्य पार पाडण्यासाठी ठरविण्यात आलेली मानके )
महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१

• **विभाग** 5. **The rules, regulations, instructions, manuals and records held by it or under its control or used by its employees for discharging its functions**

( त्यांच्याकडील असलेले किंवा त्यांच्या नियंत्रणात असलेले किंवा त्यांची कार्ये पार पाडण्यासाठी त्यांच्या कर्मचारी वर्गाकडून वापरण्यात येणारे नियम, विनियम, सुचना नियमपुस्तिका आणि अभिलेख)

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१

**तक्ता ४ (१) (ब) (v)**
**विभागीय सहनिबंधक कार्यालय कामांशी संबंधीत अधिनियम / नियम**
**नमुना – अ**

| अ.क्र. | सुचना पत्रकानुसार दिलेले विषय | नियम, क्रमांक व वर्षे | अभिप्राय |
|---|---|---|---|
| १. | सहकारी संस्था कामकाज | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०<br>महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ | |
| २. | कर्मचारी / अधिकारी नियंत्रण | महाराष्ट्र नागरी सेवा नियम | |
| ३. | आर्थिक अधिकार अंमलबजावणी | महाराष्ट्र कोषागार नियम महाराष्ट्र वित्तीय नियम | |

**तक्ता ४ (१) (ब) (v)**
**विभागीय सहनिबंधक कार्यालय कामांशी संबंधीत अधिनियम / नियम**
**नमुना – ब**

| अ.क्र. | शासन निर्णयानुसार दिलेले विषय | शासन निर्णय क्रमांक व तपशील | अभिप्राय |
|---|---|---|---|
| १. | या कार्यालयातील सर्व शाखांकडे स्थायी आदेश धारीका उपलब्ध आहेत. | | |

**तक्ता ४ (१) (ब) (v)**
**विभागीय सहनिबंधक कार्यालय कामांशी संबंधीत अधिनियम / नियम**
**नमुना – क**

| अ.क्र. | शासन निर्णयानुसार दिलेले विषय | शासन निर्णय क्रमांक व तपशील | अभिप्राय |
|---|---|---|---|
| १. | या कार्यालयातील सर्व शाखांकडे स्थायी आदेश धारीका उपलब्ध आहेत. | | |

## तक्ता ४ (१) (ब) (v)
## विभागीय सहनिबंधक कार्यालय कामांशी संबंधीत अधिनियम / नियम
## नमुना — ड

| अ.क्र. | विषय | क्रमांक व तारीख | अभिप्राय |
|---|---|---|---|
| १. | शासन निर्णयानुसार दिलेले विषयांच्या अनुषंगाने या कार्यालयाचे कामकाज वाटप करण्यात आलेले आहे. कामकाजाच्या स्वरुपानुसार संबंधीत शाखांकडे संबंधित विषयांचे शासन निर्णय धारीका उपलब्ध आहेत. | | |

• विभाग 6 A statement of the categories of documents that are held by it or under its control (त्यांच्याकडे असलेल्या किंवा त्यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या दस्तऐवजांच्या प्रवर्गाचे विवरण )

**वर्गीकरण प्रकार A ( कायम स्वरुपी ठेवावयाची कागदपत्रे)**

• सहकारी संस्थेची नोंदणी व पोट नियम नोंदणी धारिका.

• विभागीय सुचना पुस्तीका (Manual)

• S.O. File (स्थायी आदेश धारीका)

• शासन निर्णय

• कागदपत्रे वर्गीकरण यादी

• अभिलेख सुची

• निवाडा व डिक्रि आदेश

• जडवस्तु संग्रह नोंदवही

• महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६१ चे कलम ३० अनुसार सर्व कागदपत्रे

**वर्गीकरण प्रकार B (35 वर्ष पर्यंत ठेवावयाची कागदपत्रे )**

• लेखापरिक्षण अहवाल

• पोटनियम दुरुस्ती प्रकरणे,

• पेन्शन प्रकरणे

• नियुक्ती आदेश

• बदली आदेश

• बढती आदेश

## **<u>वर्गीकरण प्रकार C(5 वर्षा पर्यंत ठेवावयाची कागदपत्रे)</u>**

• सहकारी संस्थांचे वार्षिक अहवाल व लेखे

• शासन राजपत्र व अधिसुचना

• विधान सभा प्रश्न व उत्तरे / विधान परिषद प्रश्न व उत्तरे, कपात सुचना, लक्षवेधी, आश्वासने

• प्रशासकिय आदेश

• तपासणी अहवाल

• आवक जावक नोंदवही

• PRA/PRB (नियतकालीक विवरणपत्रे सादरीकरण नोंदवही )

**• विभाग ७ The particulars of any arrangement that exists for consultation with or representation by, the members of the public in relation to the formulation of its policy or administration, there of**

(आपले धोरण तयार करण्याच्या किंवा त्याची अंमलबजावणी करण्याच्या संबंधात, लोकांशी विचारविनिमय करण्यासाठी किंवा लोकांकडून निवेदने केली जाण्यासाठी अस्तित्वात असलेल्या व्यवस्थेचा तपशील )

प्राप्त झालेल्या धोरणात्मक बाबींवर सुचना तसेच कायद्यातील दुरुस्तीबाबतचे प्रसताव शासनास मान्यतेसाठी सादर करण्यात येतात. अंतिम मान्यता विधीमंडळाद्वारे होते.

कलम 4 (1) (ब) (vii)

विभागीय सहिनबंधक,कार्यालयाच्या परिणामकारक कामासाठी जनसामान्यांशी सल्लामसलत करण्याची व्यवस्था

| **अ.क्र.** | **सल्लामसलती विषयक** | **कार्यप्रणालीचे विस्तृत वर्णन** | **कोणत्या अधिनियमा / नियम /परिपत्रकाद्वारे** | **पुनरावृत्ती काल** |
|---|---|---|---|---|
| १ | प्रशासक नियुक्ती | संघीय संस्थेस पत्र लिहुन प्रत्यक्ष सुनावणीस बोलावुन | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७,७८ | -- |
| २ | लेखापरिक्षण दोष दुरुस्ती | संबंधीत संस्थेस पत्र लिहुन पुर्तता करणे बाबत कळविले जाते. | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८२ | -- |
| ३ | संस्थेचे विभाजन | संघीय संस्थेस पत्र लिहुन प्रत्यक्ष सुनावणीस बोलावुन | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १८ | -- |

कलम 4 (1) (ब) (vii)

विभागीय सहिनबंधक, कार्यालय समितीची यादी

| अ.क्र. | समितीचे नांव | समितीचे सदस्य् | समितीचे उद्दिष्ट्य | किती वेळा घेण्यात येते | सभा जनसामान्यासाठी खुली आहे किंवा नाही | सभेचे इतिवृत्त |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रादेशिक / विभाग स्तरीय समिती | १) मा.सहकार आयुक्त् व निबंधक, सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य्, पुणे – अध्यक्ष<br>२) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, पुणे विभाग, पुणे – सदस्य<br>३) प्रादेशिक समाजकल्याण अधिकारी अथवा त्यांचा प्रतिनिधी – सदस्य्<br>४) उपसचिव (क्षेत्रीय आस्थापना) किंवा त्यांचा प्रतिनिधी – सदस्य्<br>५) विभागीय उपनिबंधक, सहकारी संस्था – सदस्य् सचिव | गट क मधील प्रादेशिक / विभागीय स्तरावरील पदे भरणे | आवश्यकतेनुसार | नाही | उपलब्ध |
| २ | विभागीय निवड समिती | १) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, पुणे विभाग, पुणे – अध्यक्ष्<br>२) मागासवर्गीयांचा प्रतिनिधी (उपनिबंधक दर्जा) – सदस्य्<br>३) विभागीय उपनिबंधक, सहकारी संस्था – सदस्य् सचिव | विभागातील वर्ग – ३ व वर्ग – ४ कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यासाठी | आवश्यकतेनुसार | नाही | उपलब्ध |
| ३ | पुनर्विलोकन समिती | १) विभागातील विभाग प्रमुखाव्यतीरिक्त् –<br>२) प्रशासन अधिकारी विभागीय कृषि सहसंचालक , पुणे विभाग<br>३) विभागीय उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे विभाग अथवा विभागातील अन्य ज्येष्ठ वर्ग 1 / 2 अधिकारी | गट क मधील विभागीय स्तरावरील कर्मचाऱ्यांच्या वयाची ५५ वर्ष व सेवेच्या ३० वर्षानंतर शासन सेवेत राहण्याची पात्रापात्रता ठरविणे | वर्षातून एकदा | नाही | उपलब्ध |

• विभाग 8 A statement of the boards councils and other bodies – Minutes

**( आपला एक भाग म्हणुन किंवा सल्ला देण्याच्या प्रयोजनासाठी म्हणून घटीत केलेल्या दोन किंवा अधिक व्यक्तींच्या मिळुन बनलेल्या मंडळांचे, परिषदांचे, समित्यांचे आणि निकायांच्या बैठकी लोकांसाठी खुल्या आहेत किंवा कसे ? अशा बैठकीची कार्यवृत्ते जनतेला पहावयास मिळण्याजोगी आहेत किंवा कसे ? याबाबतचे विवरण)**

सुधारित कायद्याप्रमाणे कलम ८१ अधिन तरतुदीप्रमाणे सर्व सहकारी संस्था त्यांचे आर्थिक लेख्यांचे प्रतिवर्षी लेखापरिक्षण करवुन घेणेसाठी वार्षिक साधारण सभेमध्ये लेखापरिक्षकांच्या नामिकेवरील पात्र लेखापरीक्षकांची नेमणुक करेल. जेथे अशी नेमणुक होणार नाही त्या स्थितीमध्ये निबंधक परंतुकांचे आदेशाने लेखापरिक्षकाची नेमणुक करुन प्रत्येक संस्थेची लेखापरीक्षा करवुन घेईल.

• विभाग -9 A directory of officers and employees

(अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची निर्देशिका)

विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, पुणे विभाग पुणे

कार्यालय ०२०-२५५३७६१८    फॅक्स् नं. ०२०-२५५३३५३४

| अधिकाऱ्याचे नांव व पदनाम |
|---|
| श्री.दिपक तावरे – विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, पुणे विभाग, पुणे |
| श्री. एन.एस.कंजेरी – विभागीय उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे विभाग, पुणे |
| श्री.सी.वाय.पिंगळे – विशेष लेखापरिक्षक (वर्ग १ )सहकारी संस्था (फिरते पथक) पुणे विभाग,पुणे |
| श्री.डी.एस.सोनवणे – कार्यालय अधिक्षक |
| श्री.पी.सी.बडदे- लघुलेखक (निम्नश्रेणी) |
| श्री.बी.बी.कारंडे- लेखापरिक्षक (श्रेणी १) सहकारी संस्था, फिरते पथ्क, पुणे विभाग, पुणे |
| श्री.एस.टी.शिंगाडे- प्रतवारी निरिक्षक |
| सौ.एस.ए.अभ्यंकर – मुख्य् लिपिक |
| सौ.एस.आर.रणदिवे – सहकारी अधिकारी (श्रेणी २) |
| सौ. एस.के.बागाईतकर – सहाय्यक सहकारी अधिकारी |
| सौ.एन.एन.गुरव – वरिष्ठ लिपिक |
| सौ.सी.पी.मराठे- सहाय्यक सहकारी अधिकारी |
| सौ.एस.आर.कोराड – वरिष्ठ लिपिक |
| श्री. एस.आर.पवार – सहाय्यक सहकारी अधिकारी |
| श्रीमती एस.जे.लोबो – वरिष्ठ लिपिक |
| सौ.एस.एस.हिरे – कनिष्ठ लिपिक |
| सौ. एस.एस.बिडवई – कनिष्ठ् लिपिक |
| रिक्त पद – कनिष्ठ लिपिक |
| श्री. श्रीहरी काळे – वाहन चालक |
| श्री. व्ही.जी.बांबळे – नाईक |
| श्री. बी.एम.पासलकर – शिपाई |
| श्री. एस.के.गावडे – शिपाई |
| श्री. व्ही.आर. दिनकर, शिपाई |

• **विभाग 10. The monthly remuneration received by each of officers and employees including the system of compensation as provided in regulations**

| पदनाम | वेतनश्रेणी |
|---|---|
| विभागीय सहनिबंधक | १५,६००-३९१०० ग्रेड पे ६६०० |
| विशेष लेखापरिक्षक (वर्ग १)(फिरते पथक) | १५,६००-३९१०० ग्रेड पे ६६०० |
| विभागीय उपनिबंधक | १५,६००-३९१०० ग्रेड पे ५४०० |
| लघुलेखक | ९३००-३४८०० ग्रेड पे ४४०० |
| कार्यालय अधिक्षक / लेखापरिक्षक (श्रेणी १) | ९३००-३४८०० ग्रेड पे ४३०० |
| सहकारी अधिकारी (श्रेणी २)/मुख्य लिपिक/प्रतवारी निरिक्षक | ९३००-३४८०० ग्रेड पे ४२०० |
| सहाय्यक सहकारी अधिकारी / वरिष्ठ लिपिक | ५२००-२०२०० ग्रेड पे २४०० |
| कनिष्ठ लिपिक | ५२००-२०२०० ग्रेड पे १९०० |
| वाहन चालक | ५२००-२०२०० ग्रेड पे १९०० |
| नाईक | ५२००-२०२०० ग्रेड पे २१०० |
| शिपाई | ४४००-७४४० ग्रेड पे १३०० |

• **विभाग 11 The budget allocated to each of its agency indicating the particulars of all plans proposed expenditures and reports on disburesments made**
**( सर्व योजनांचा तपशील , प्रस्तावित खर्च दर्शविणारा, आपल्या प्रत्येक अभिकरणाला नेमुन दिलेल्या अर्थसंकल्प आणि संवितरित केलेल्या रकमांचा अहवाल ) याबाबत**

| अ.क्र. | अंदाजपत्रकिय शीर्षाचे वर्णन | अनुदान (रुपये हजारात) | नियोजीत वापर (क्षेत्र व कामाचा तपशिल) | अधिक अनुदान अपेक्षित असल्यास रुपयात (हजारात) | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| १ | ००१ (०१)(०५) विभागीय व जिल्हा प्रशासन (४२५००६७) | १३२३०६ | वेतन | १०३९४९ | महागाईभत्ता वाढ |
| | | ५६० | प्रवास | १०९५ | |
| | | ६७८ | कार्यालयीन खर्च | १६२३ | |
| | | १९ | अतिकालीक भत्ता | ४० | |
| | | १४ | वाहन दुरुस्ती | ५० | |
| | | ७५२ | वीज दुरध्वनी | ७९० | |
| | | ३५०० | भाडेपट्टी व कर | ३२८१ | |
| २ | फिरते पथक ४२५०२२७ | १७९९ | वेतन | १०८० | |
| | | ६२ | प्रवास | ० | |
| | | १९ | कार्यालयीन खर्च | ० | |
| ३ | २४२५०४०५ प्रतवारी | ६२५० | वेतन | १३९४० | |
| | | ३४ | प्रवास | १२० | |
| ४ | ७६१० शासकीय कर्मचारी यांना कर्ज | १२० | मोटार वाहन | ७० | प्राप्त प्रस्ताव |
| | | ६० | संगणक | ० | प्रस्ताव अप्राप्त |
| | | ० | घरबांधणी अग्रीम | २९२८ | |

• **विभाग 12. The manner of execution of subsidy programmes including amount allocated and the details of beneficiaries of such programmes**

**( अर्थसहाय्य कार्यक्रमाच्या अंमलबजावणची रित तसेच वाटप केलेल्या रकमा आणि अशा कार्यक्रमांच्या लाभधारकांचा तपशील) याबाबत , आणि**

• **विभाग 13.particulars of receipts of concessions permits or authorisations granted by it**

**( ज्या व्यक्तींना सवलती, परवाने व प्राधिकारपत्रे दिलेली आहेत अशा व्यक्तींचा तपशील)**

**विभागीय सहनिबंधक, सहकारी संथा पुणे विभाग, पुणे कार्यालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती**

**१) योजनेचे नाव : डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना**

| | |
|---|---|
| अ) योजना केहापासुन कार्यान्वीत आहे | १९९१ |
| ब) योजनेचा उद्देश व स्वरुप | रु. १,00,000/- पर्यंतचे अल्प मुदतीचे पीक कर्ज घेणाऱ्या आणि विहित मुदतीत परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ३% वार्षिक दराने व रु. १,००,०००/- पेक्षा जास्त् पण रु.३.०० लाखापर्यंत अल्प् मुदतीचे पीक कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांना १% वार्षिक दराने व्याजाची सवलत लागु राहील. सदर पीक कर्जाची संपूर्ण परतफेड प्रतिवर्षी ३० जुनच्या आत करणे आवश्यक आहे. |
| क) लाभार्थी | विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांचे राष्ट्रीयकृत बँकांचे प्रादेशिक ग्रामीण बँकांचे व खाजगी बँकांचे नियमित परतफेड करणारे कर्जदार तसेच या योजनेअंतर्गत, अनुसुचित जाती व नवबौध्द् कर्जदार सभासदांना विशेष घटक योजने अंतर्गत उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे लाभ देण्यात येतो |
| ड) अर्ज कोणाकडे करावयाचा | सहाय्यक निबंधक/उपनिबंधक |
| इ) मंजुरीचे अधिकार | जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था |

**२) योजनेचे नाव : डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना (जिल्हास्तरीय)**

| | |
|---|---|
| अ) योजना केहापासुन कायवत आहे | **१९९१** |
| ब) योजनेचा उद्देश व स्वरुप | सर्वसाधारण सभासदाप्रमाणे |
| क) लाभार्थी | अनुसुचित जाती व नवबौध्द् कर्जदार सभासद विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांचे राष्ट्रीयकृत बँकांचे प्रादेशिक ग्रामीण बँकांचे व खाजगी बँकांचे नियमित परतफेड करणारे कर्जदार तसेच या योजनेअंतर्गत, अनुसुचित जाती व नवबौध्द् कर्जदार सभासदांना विशेष घटक योजने अंतर्गत उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे लाभ देण्यात येतो |
| ड) अर्ज कोणाकडे करावयाचा | सहाय्यक निबंधक/उपनिबंधक |
| इ) मंजुरीचे अधिकार | जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था |

### ३) योजनेचे नाव : राज्यातील शेतकऱ्यांना ६% व्याजदराने अल्पमुदती कर्ज पुरवठा करणे

| | |
|---|---|
| अ) योजनेचे उद्देश व स्वरुप | जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, राष्ट्रीयकृत बँका, खाजगी बँका, व प्रादेशिक ग्रामीण बँकांना एक टक्का व्याज परतावा शासनाकडून देण्यात येतो जिल्हामध्यवर्ती सहकारी बँकांना २.५०% दराने व्याज परतावा देण्यात येतो. तथापि नाबार्डकडून मिळणाऱ्या पुर्नवित्त् / कर्जपुरवठ्यावर व्याज परतावा अनुज्ञेय नाही. |
| ब) लाभार्थी | जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका / प्राथमिक कृषि पतसंस्था, राष्ट्रीयकृत बँका व प्रादेशिक ग्रामीण बँका व खाजगी बँका |
| क) अर्ज कोणाकडे करावयाचा | १) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी  जिल्हा उपनिबंधक यांचेकडे<br>२) राष्ट्रीयकृत / प्रादेशिक ग्रामीण बँकांनी बँक शाखा ज्या तालुक्यात आहे त्या तालुका सहाय्यक / उपनिबंधक यांचेकडे |
| ड) मंजुरीचे अधिकार | सहकार आयुक्त् व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य्, पुणे |

### ४) योजनेचे नाव : उपसा जलसचन योजनांना अर्थसहाय्य

| | |
|---|---|
| अ) योजना केहापासुन कार्यान्वीत आहे | १९९४ |
| ब) योजनेचा उददेश व स्वरुप | सहकारी उपसा सिंचन संस्थामार्फत जास्तीत जास्त जमीन ओलीताखाली आणण्यासाठी उपसा जलसिंचन योजनांना प्रकल्प खर्चाच्या एकूण २५% किंवा रु.१०० लाख यापैकी जी रक्कम कमी असेल त्या रकमे इतके शासन सदर संस्थेस अनुदान मंजूर करते राज्यातील सहकारी उपसा जलसिंचन योजनेंच्या प्रकल्प खर्चामध्ये गेल्या काही वर्षात सात्त्याने वाढ होत आहे व सदर प्रकल्पावर खर्च करणे आर्थिकदृष्ट्या सभासदांना अडचणीचे झाले आहे. सभासदांवरील खर्चाचा बोजा कमी करुन तो काही प्रमाणात शासनाने उचलण्यासाठी ही योजना कार्यान्वित आहे. |
| क) लाभार्थी | दिनांक १/४/१९९४ नंतर नोंदलेल्या सहकारी उपसा जलसिंचन संस्था व दिनांक १/४/१९९४ रोजी ज्या सहकारी उपसा जलसिंचन संस्थांची कर्जमागणी प्रकरणे वित्तीय संस्थांकडे प्रलंबित होती व ज्यांनी प्रकल्प उभारणीच्या कामास सुरुवात केली नव्हती अशा संस्था |
| ड) अर्ज कोणाकडे करावयाचा | सहाय्यक निबंधक / उपनिबंधक सहकारी संस्था |
| इ) मंजुरीचे अधिकार | राज्य् शासन |

**५) योजनेचे नाव : सावकारी कर्जमाफी २०१५**

| | |
|---|---|
| अ) योजना केहापासुन कार्यान्वीत आहे | २०१५ (शासन निर्णय क्रमांक एमएलए १०१५/प्र.क्र.२५/७-स दि. १० एप्रिल २०१५ नुसार) |
| ब) योजनेचा उददेश व स्वरुप | परवानाधारक सावकारांकडून घेतलेल्या कर्जास शासनाने माफी जाहीर केली असल्याने योजनेनुसार पात्र कर्जाच्या मुद्दलाची व व्याजाची शासनाचे वतीने भरपाई करणे. |
| क) लाभार्थी | लाभार्थी शेतकऱ्याच्या कुटुंबातील व्यक्तीने परवानाधारक सावकाराकडून कर्ज घेतले असल्यास असेही कर्ज या योजनेस पात्र राहील. परवानाधारक सावकाराकडून कर्ज घेतलेला शेतकरी जर पगारदार व्यक्ती, निवृत्तीवेतन धारक व्यक्ती व मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम १९४८ नुसार परवानाधारक व्यक्ती या योजनेला पात्र असणार नाहीत. |
| ड) अर्ज कोणाकडे करावयाचा | तालुका उप/सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था |
| इ) मंजुरीचे अधिकार | १. तालुका स्तरीय समिती<br>२. जिल्हा स्तरीय समिती |

**६) योजनेचे नाव : प्राथमिक कृषि पतपुरवठा सहकारी संस्थांचे सक्षमीकरण २०१५**

| | |
|---|---|
| अ) योजना केहापासुन कार्यान्वीत आहे | २०१५-१६ (शासन निर्णय क्रमांक सीसीआर/०३१३/प्र.क्र.१४४/२-स दि.६ सप्टेंबर, २०१४ नुसार) |
| ब) योजनेचा उद्देश व स्वरुप | अल्पमुदत सहकारी पतसंरचने अंतर्गत (STSC) प्राथमिक कृषि पतपुरवठा सहकारी संस्थांचे सक्ष्मीकरण करण्याचा उद्देश आहे. प्राथमिक कृषि पतपुरवठा सहकारी संस्थांना पीक कर्ज वाटपाच्या प्रमाणात अथसहाय्य देण्याबाबत शासन निर्णयात नमुद आहे. अर्थसहाय्याची अधिकतम मर्यादा रु. १.०० लाख प्रति संस्था प्रमाणे आहे. |
| क) लाभार्थी | प्राथमिक कृषि सहकारी पतसंस्था |
| ड) अर्ज कोणाकडे करावयाचा | सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था |
| इ) मंजुरीचे अधिकार | जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था |

### ७) योजनेचे नाव : औद्योगिक सहकारी संस्थांना भागभांडवली अंशदान

| | |
|---|---|
| अ) योजना केहापासुन कार्यान्वीत आहे | औद्योगिक संस्थांना आपला आर्थिक पाया मजबुत करण्यासाठी व त्यांच्या अडचणी निवारण्याकरीता महाराष्ट्र शासन १:३ प्रमाणात भागभांडवल देते. औद्योगिक सहकारी संस्थांना वित्तीय संस्थांकडून आवश्यक प्रमाणात कर्ज उभा करण्याची पात्रता वाढविण्यासाठी ही योजना कार्यान्वीत आहे. सदर योजनेमध्ये प्रकल्प किमतीच्या ६०% वित्तीय संस्थेचे कर्ज १०% संस्थेचे भागभांडवलाची परतफेड १५ वर्षामध्ये करावयाची आहे. |
| ब) लाभार्थी | औद्योगिक सहकारी संस्था |
| क) अर्ज कोणाकडे करावयाचा | सहाय्यक निबंधक/उपनिबंधक, सहकारी संस्था |
| इ) मंजुरीचे अधिकार | राज्य् शासन |

### ८) योजनेचे नाव : औद्योगिक सहकारी संस्थांना भागभांडवल अंशदान

| | |
|---|---|
| अ) योजना केहापासुन कार्यान्वीत आहे | १९७२-७३ |
| ब) योजनेचा उद्देश व स्वरुप | ग्रामीण भागातील बलुतेदारांनी उत्पादीत केलेल्या मालाची विक्री करणे व बलुतदारांना तांत्रिक / व्यावसायीक सल्ला देणे व मार्गदर्शन करणे यासाठी बलुतेदारांच्या औद्योगिक सहकारी संस्था तालुका पातळीवर १:२ या प्रमाणात शासकीय भागभांडवल देण्यात येते. बलुतेदारांना बलुतेदार सहकारी संस्थांचा भाग भांडवली पचया मजबुत करणे व त्यायोगे बलुतेदारांना स्वयंरोजगारासाठी प्रोत्साहित करुन त्यांच्या उत्पन्नात वाढ करणे आवश्य्क आहे. |
| क) लाभार्थी | बलुतेदार सहकारी संस्था |
| ड) अर्ज कोणाकडे करावयाचा | सहाय्यक निबंधक/उपनिबंधक, सहकारी संस्था |
| इ) मंजुरीचे अधिकार | विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था |